महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०१२०/सी.आर.३१/२०२१/धो.सं. दिनांक: - १२ सप्टेंबर, २०२२

## -: प्रसिद्धीपत्रक: -

**विषय:-समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांच्या क्रमांकन / प्राधान्य क्रमवारीबाबत**
**संदर्भ:-(१) आयोगाची कार्यनियमावली, दिनांक १६ मे, २०१४**
**(२) आयोगाच्या कार्यनियमावलीमधील दिनांक २३ जुलै २०२० रोजीची सुधारणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध भरतींकरीता अंतिम शिफारस यादी/निवड यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचे क्रमांकन / प्राधान्य क्रमवारी (Ranking) आयोगाच्या कार्यनियमावलीमधील संदर्भिय दिनांक २३ जुलै, २०२० रोजीच्या सुधारणेद्वारे करण्यात आलेल्या निकषानुसार निश्चित करण्यात येते. प्रस्तुत दिनांक २३ जुलै २०२० रोजीच्या सुधारणेद्वारे निश्चित करण्यात आलेल्या निकषांचा साकल्याने विचार करुन सदर निकष रद्द करण्याचा तसेच आयोगाच्या दिनांक १६ मे, २०१४ रोजीच्या कार्यनियमावलीतील नियम १०, उपनियम (७) मध्ये नमूद निकषानुसार क्रमांकन (Ranking) करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानुसार अंतिम शिफारस यादी/निवड यादी तयार करताना समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांचे क्रमांकन खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल: -

(1) Educational Qualification as on the last date of receipt of application in descending order as Ph.D., M. Phil, Post Graduation, Post Graduation by Distance Education.
(2) The date of acquiring higher qualification.
(3) Preferential qualification if so mentioned in the advertisement/Notification/Rule of Recruitment.
(4) If the experience is desired for the post in question then the experience on the last day of receipt of application.
(5) If a provision is made in the advertisement or Notification or Rule of Recruitment then Backward classes candidates in ST, SC, DT(A), NT(B), SBC, NT(C) in that order.
(6) Older in Age.
(7) Thereafter the ranking should be decided by the first letter of the surname as it appears alphabetically.
(8) For Departmental PSI Only
(1) Degree+Maximum to Minimum experience in descending order.
(2) $12^{th}$ + Maximum to Minimum experience in descending order.
(3) $10^{th}$ + Maximum to Minimum experience in descending order

२. आयोगाच्या प्रस्तुत निर्णयाची अंमलबजावणी आगामी काळात प्रसिध्द होणाऱ्या सर्व जाहिरातींपासून करण्यात येईल. तसेच, त्याप्रमाणे आयोगाच्या कार्य नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात येईल. सदर सुधारणा होईपर्यंतच्या कालावधीत कार्यनियमावलीमध्ये सुधारणा झाली आहे; असे समजून प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, धोरण व संशोधन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग